ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । न्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३९ • सोमवार दि.२ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

नांदेड न्यायालय तातडीने रिकामे;राज्यातील जिल्हा न्यायालयांना बॉम्बस्फोटाची धमकी



बॉम्बशोधक पथकांकडून तपासणी,अज्ञात ई-मेलद्वारे धमकी, पोलिसांची धावपळ

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील एकाच वेळी अनेक जिल्हा न्यायालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे मिळाल्याने न्यायालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. नांदेड जिल्हा न्यायालयालाही धमकी मिळाल्याची माहिती समोर आल्याने पोलिस आणि न्यायालयीन प्रशासन सतर्क झाले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून न्यायालय परिसर तातडीने रिकामा करण्यात आले. पोलीसांच्या बॉम्बशोधक पथक व श्वान पथकाने न्यायालयीन परिसराचा कसून तपासणी केली. त्यामुळे न्यायाधीश, वकील, कर्मचारी आणि नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले. न्यायालयांच्या परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला. राज्यातील सातारा, ठाणे, बीड, हिंगोली आणि सोलापूरसह अन्य जिल्ह्यांतील न्यायालयाची पोलीसांनी तपासणी केली.

राज्यातील विविध जिल्हा न्यायालयांना धमकीचे ई-मेल मिळाल्याची माहिती नांदेडमध्ये पोहोचल्यानंतर स्थानिक पोलिस यंत्रणाही सतर्क झाली. नांदेड जिल्हा न्यायालय परिसरात खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या. न्यायालय परिसर रिकामा करून सुरक्षेच्या दृष्टीने तपासणी करण्यात आली. न्यायालयात येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला. अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे न्यायालय परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या.

नांदेडप्रमाणेच ठाणे, बीड आणि हिंगोली जिल्हा न्यायालयांनाही बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे मिळाली. धमकीचा संदेश मिळताच संबंधित जिल्ह्यांतील पोलिसांनी न्यायालय परिसरात धाव घेतली. न्यायालयातील नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढून इमारती रिकाम्या करण्यात आल्या. त्यानंतर बॉम्बशोधक व नाशक पथकांच्या मदतीने परिसराची तपासणी सुरू करण्यात आली. सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयालाही अशाच प्रकारचा धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. दरम्यान, धमकी मिळालेल्या न्यायालयांमध्ये प्रत्यक्षात स्फोटक पदार्थ आढळल्याची *पान ४ वर*

सायबर पोलिसांकडून ई-मेलचा शोध

या सर्व घटनांमागे एकच व्यक्ती किंवा संघटित यंत्रणा आहे का, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. धमकीचे ई-मेल कोणत्या संगणकावरून किंवा इंटरनेट पत्त्यावरून पाठविण्यात आले, त्यामागील उद्देश काय आणि धमकी देणाऱ्याची ओळख कोणती, याचा शोध घेण्यासाठी सायबर पोलिस यंत्रणा सक्रिय झाली आहे. बॉम्बशोधक पथकांकडून संबंधित न्यायालयांच्या इमारती आणि परिसराची तपासणी केली जात आहे.

गुरुद्वारा बोर्डाच्या सचिवपदाचा पदभार स.रविंद्रसिंघ बुंगई यांनी स्विकारला



नांदेड/प्रतिनिधी-येथील धार्मिक संस्था गुरुद्वारा तखत सचखंड बोर्डाच्या सचिव पदाची सुत्रं पुन्हा सरदार रविंदर सिंघ बुंगाई यांनी स्वीकारली आहे. सोमवार दि. २ नोहेंबर रोजी दुपारी गुरुद्वारा दर्शन घेतलल्या नंतर त्यांनी बोर्ड कार्यालयात पोहचून आपल्या कार्यालयात रीतसर पद स्वीकारला.

यावेळी त्यांच्या समवेत गुरुद्वारा बोर्डाचे सदस्य सरदार मनप्रीत सिंघ कुंजीवाले, माजी सदस्य भागिंदर सिंघ घड़ीसाज, सुरेंद्रसिंघ मेंबर, अवतारसिंघ पहरेदार, अधीक्षक रविंदरसिंघ कपूर, दिलीप सिंघ रागी, नरेन्द्र सिंघ चिरागिया, दीपक सिंघ गल्लीवाले सह मोठ्या संख्येत अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. दि. २६ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र शासनाने दि. २९ जून २०२२ च्या परिस्थितीचा गुरुद्वारा बोर्ड पूनर्बहाल केला होता. त्यानुसार आता गुरुद्वारा सचखंड बोर्ड कार्यालयात कार्य सुरु झाले आहेत. पदभार स्वीकारल्या नंतर रविंदरसिंघ बुंगाई यांनी विकासाच्या नवीन योजना सुरु करण्यात येतील अशी घोषणा केली. गुरुद्वारा सचखंड बोर्डाच्या कर्मचाऱ्यांना अर्धा पगार दिवाली बोनस म्हणून देण्याची घोषणा उपाध्यक्ष गुरविंदरसिंघ बावा यांच्यावतीने करण्यात येत आहे असा निर्वाळा बुंगाई यांनी दिला. तसेच बोर्डातील विधवा महिला कर्मचाऱ्यांना प्रत्येकी एक हजार रूपये व्यतरित देण्यात येतील अशी घोषणा केली.

राज्य मंत्रिमंडळात फेरबदलाचे संकेत

रा.काँ.नेत्यांची भाजप नेत्यांसोबत खलबते; माजी मंत्र्याच्या पुनर्वसनाची चर्चा

मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राजकीय वर्तुळात मंत्रिमंडळ फेरबदलाच्या पार्श्वभूमीवर हालचालींना वेग आला आहे. पक्षातील एका माजी मंत्र्याचे लवकरच राज्य मंत्रिमंडळात पुनरागमन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाने अनुकूल भूमिका घेतल्याची माहिती असून, संबंधित माजी मंत्र्याने नुकतीच दिल्लीत महायुतीतील वरिष्ठ नेत्यांची भेट घेतल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजते. रविवारी रात्री दिल्लीत झालेल्या या भेटीमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्र वादी काँग्रेसमधील संबंधित माजी मंत्र्याच्या पुनरागमनाला पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून हिरवा कँदील मिळाल्यानंतर मंत्रिमंडळातील समावेशासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर संबंधित माजी मंत्री आणि पक्षातील एका वरिष्ठ मंत्र्याने दिल्लीत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतल्याचे सांगितले जात आहे.दरम्यान, संबंधित नेत्याच्या मंत्रिमंडळातील पुनरागमनासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनीही पुढाकार घेतल्याची माहिती आहे. सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांनी गुरुवारी रात्री वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीत आगामी मंत्रिमंडळ फेरबदलात राष्ट्रवादी काँग्रेसच्या संबंधित माजी मंत्र्याला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे असलेल्या अतिरिक्त खात्यांपैकी एका खात्याची जबाबदारी देण्याबाबत मुख्यमंत्र्यांकडे विनंती करण्यात आल्याचे समजते.यापूर्वी सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचीही भेट घेऊन या विषयावर चर्चा *पान ४ वर*

मुरासू चक्रीवादळाचा आंध्र प्रदेशला धोका

वाऱ्याचा वेग ताशी ११० किमीचा अंदाज; चेन्नईत मुसळधार पाऊस, विमानांची उड्डाणे रद्द

नवी दिल्ली:बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले मुरासू चक्रीवादळ वेगाने आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या दिशेने सरकत असून, किनारपट्टी भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, हे चक्रीवादळ २ नोव्हेंबरच्या रात्री साडेअकरा वाजल्यापासून ३ नोव्हेंबरच्या पहाटे चार वाजेपर्यंत ओंगोले परिसरात किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. या वेळी वाऱ्याचा वेग ताशी १०० ते ११० किलोमीटरपर्यंत राहण्याचा अंदाज आहे. संभाव्य धोका लक्षात घेऊन आंध्र प्रदेशसह तामिळनाडू आणि ओडिशा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवली आहे. सोमवारी पहाटे साडेपाच वाजताच्या माहितीनुसार, चक्रीवादळ चेन्नईपासून सुमारे २०० किलोमीटर, तर नेल्लोरपासून २१० किलोमीटर अंतरावर होते.

आढावा बैठकीत लोकप्रतिनिधींनी काढले आरोग्य विभागाचे वाभाडे



नांदेड/प्रतिनिधी-जनसंवाद यात्रेनिमित्त राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित आरोग्य समितीच्या आढावा बैठकीत लोकप्रतिनिधींनी आरोग्य विभागातील गलथान कारभाराचे चांगलेच वाभाडे काढले आहेत.

राज्याचे आरोग्यमंत्री ना.प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली आज (सोमवार) सकाळी नियोजन भवन येथे जनसंवाद यात्रेनिमित्त आरोग्य समितीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींनी आरोग्य विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार व गलथान कारभाराचे पाडेच वाचले आहेत. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालयात अधिकारी व कर्मचारी सतत गैरहजर राहत असतात. गैरहजर राहणारे अधिकारी हे पगारातील अर्धा पगार हा वरिष्ठ अधिकाऱ्यांना हप्ता म्हणून दिला जात असल्याचा आरोप आ.डॉ.तुषार राठोड यांनी बैठकीत दुरदर्शीप्रणालीद्वारे उपस्थित राहून केला आहे. त्यामुळे बैठकीतील अधिकाऱ्यांचे चेहरे पाहण्यासारखे झाले होते. आ.डॉ.राठोड यांनी केलेले आरोप हे खरे आहेत. गैरहजर असलेल्या डॉक्टरांचा हप्ता वर दिला जातो. व उपस्थित डॉक्टर त्याचे वेतन घेतो, असे आ.राजेश पवार यांनी बैठकीत म्हटले. रुग्णालयातील ७० टक्के अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याचे त्यांनी सांगितले. रुग्णांची तपासणी कागदोपत्री दाखविली जात आहे. ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना देण्यात येणारे भोजन निकृष्ट असल्याचा आरोप आ.पवार यांनी केला. यासर्व प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करण्याचे आदेश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. आरोग्य विभागातील लोकांकडून नागरिकांना असुविधा दिल्या जात आहेत. रुग्णालयात डॉक्टर व कर्मचारी कधीच वेळेवर येत नाहीत. रुग्णांना अनेक तास ताटकळ थांबावे लागते. अशी तक्रार आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी केली. रुग्णालयातील इमारतीचे उद्घाटन करण्यात आलेले आहे परंतु त्याठिकाणी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली नाही. भोकर व मुदखेड येथे रुग्णालयातील रिक्त जागा तातडीने भरण्याची मागणी आ.श्रीजया चव्हाण यांनी केली. सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यास शासनाने मान्यता *पान ४ वर*

खानापूर येथील जि.प.शाळेत विषय शिक्षक व पूर्णवेळ मुख्याध्यापकच नाही

देगलूर/प्रतिनिधी-गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या घोषणा एकीकडे आणि प्रत्यक्षात कमी शिक्षकांकडून शिक्षण घेणारे विद्यार्थी दुसरीकडे, अशी विदारक परिस्थिती खानापूर येथील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये निर्माण झाली आहे. वर्षभरापासून गणित, इंग्रजी आणि सामाजिक शास्त्र या महत्त्वपूर्ण विषयांसाठी शिक्षकच उपलब्ध नसल्याने दहावीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागले आहे. त्यातच पूर्णवेळ मुख्याध्यापक आणि शिपाई पदही रिक्त असल्याने शिक्षण व्यवस्थेतील या अनास्थेबद्दल ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दहावीचे वर्ष विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारे असते. या काळात योग्य मार्गदर्शन आणि नियमित अध्यापन मिळणे अत्यावश्यक आहे. मात्र शिक्षकांच्या रिक्त पदामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असेल, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके आणि डोळ्यात उज्वल भविष्याची स्वप्ने असताना त्यांना आवश्यक शिक्षकच मिळत नसतील, तर त्यांच्या स्वप्नाचे काय होणार, असा भावनिक सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. या गंभीर प्रश्नाकडे शिक्षण विभागाचे लक्ष वेधण्यासाठी खानापूर येथील ग्रामस्थांनी देगलूरचे गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी, उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांनाही निवेदनाची प्रत दिली. शाळेतील गणित, इंग्रजी आणि सामाजिक शास्त्र विषयांच्या शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, पूर्णवेळ मुख्याध्यापक आणि शिपाई पदाचीही व्यवस्था करावी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवून त्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

विद्यार्थ्यांचे भविष्य घडवूनही शिक्षण विभागाची जबाबदारी आहे. रिक्त पदांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष न करता तातडीने कारवाई करावी आणि खानापूरच्या विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांनी केली आहे. निवेदनावर विनोद रायकोडे, संतोष कदम, संतोष लाळे, शिवराज सुंके, बजरंग कोरेवाड, नवाजी बक्कनवार, वीरभद्र शिवाचार्य यांच्यासह समस्त गावकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

शिक्षक समायोजनाची शक्यता!

देगलूर तालुक्यातील खानापूरसह काही शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत. खानापूर शाळेतील विज्ञान व इंग्रजी विषयांचे शिक्षक जून महिन्यात सेवानिवृत्त झाले आहेत. न्यायालयीन प्रक्रियेमुळे नियमित समायोजन रखडले असले, तरी विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी वरिष्ठांच्या *पान ४ वर*

शिक्षकाविना बोर्डाची परीक्षा, विद्यार्थ्यांनी भविष्य घडवायचे कसे?

खानापूरच्या जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये ४०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र दहावीच्या बोर्ड परीक्षेच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर गणित आणि इंग्रजी सारख्या विषयांचे शिक्षकच उपलब्ध नसतील, तर विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण यश मिळवायचे कसे? सामाजिक शास्त्रासारख्या विषयांचे शिक्षणही मिळत नसेल, तर विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा पाया भक्कम होणार तरी कसा? आज गणित-इंग्रजी शिकवण्यासाठी शिक्षकच नाहीत, तर उद्या याच विद्यार्थ्यांनी डॉक्टर, इंजिनीयर आणि अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण कसे करायचे? हा प्रश्न केवळ खानापूर मधील विद्यार्थ्यांला नाही, तर ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेच्या वास्तवावर बोट ठेवणारा आहे.

माझ्याविरोधात महिलांची टोळी तयार

मनोज जरांगेंचा मुख्यमंत्री फडणवीसांवर गंभीर आरोप!

परभणी/प्रतिनिधी-माझ्याविरोधात महिलांची टोळी तयार केली जात असून, काही महिला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटल्या होत्या, असा गंभीर आरोप मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांनी पुरावे मागितल्यास ते देण्यास तयार असल्याचे सांगत त्यांनी थेट फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. परभणी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी हे आरोप केले.



मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी मुख्यमंत्री कार्यालयातील ओएसडीचा उल्लेख करत आपल्या विरोधात काही घडामोडी सुरू *पान ४ वर*

वाडी (बु.) च्या उपजिल्हा रुग्णालयातून आरोग्यसेवेचा नवा अध्याय!

नांदेड शहराच्या जवळ असलेल्या वाडी (बु.) परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या उपजिल्हा रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा काल राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांचीही उपस्थिती होती. नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आ.बालाजीराव कल्याणकर यांनी पुढाकार घेऊन या रुग्णालयाची उभारणी केली. नांदेडच्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरी विस्ताराच्या पार्श्वभूमीवर शासकीय आरोग्य यंत्रणेत पडलेली ही भर निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, एखाद्या रुग्णालयाच्या इमारतीचे लोकार्पण म्हणजे आरोग्यसेवेची जबाबदारी पूर्ण झाली असे मानता येणार नाही. या रुग्णालयातून सर्वसामान्यांना दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळते की नाही, हेच त्याच्या यशाचे खरे मोजमाप ठरणार आहे.नांदेड शहराचा विस्तार गेल्या काही वर्षांत झपाट्याने झाला आहे. लोकसंख्या वाढत असताना नागरी सुविधांवरील ताणही वाढत आहे. विशेषतः आरोग्यसेवेच्या बाबतीत शहरातील परिस्थितीचा विचार केला तर खाजगी रुग्णालयांचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारलेले दिसते. श्री गुरुगोविंदसिंहजी स्मारक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला संलग्न असलेले शासकीय रुग्णालय आणि स्वतंत्र जिल्हा रुग्णालय अशी शासकीय आरोग्यसेवेची व्यवस्था शहरात उपलब्ध आहे. तरीही वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत या सुविधांवर प्रचंड ताण पडत आहे. अशा परिस्थितीत वाडी (बु.) येथील उपजिल्हा रुग्णालयाची निर्मिती ही काळाची गरज होती. या रुग्णालयामुळे शहराच्या उत्तर भागातील नागरिकांना जवळच उपचाराची सुविधा उपलब्ध होऊ शकते आणि मुख्य शासकीय रुग्णालयावरील रुग्णांचा भारही कमी होऊ शकतो. दीड-दोन दशकांपूर्वी वैद्यकीय व्यवसायाकडे सेवाभावी दृष्टिकोनातून पाहिले जात होते. अर्थात आजही अनेक डॉक्टर रुग्णसेवेचे व्रत जपत आहेत; परंतु एकूणच वैद्यकीय क्षेत्राचे व्यापारीकरण झपाट्याने वाढले आहे. उपचारांचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. नांदेडच्या अर्थकारणात शैक्षणिक क्षेत्रातील अकरावी-बारावीच्या शिकवणी वर्गांबरोबरच खाजगी रुग्णालयांचेही मोठे स्थान निर्माण झाले आहे. शहरात एकीकडे अत्याधुनिक खाजगी रुग्णालयांची संख्या वाढत असताना दुसरीकडे आर्थिक परिस्थितीमुळे सामान्य रुग्णांना उपचारासाठी कर्ज काढण्याची वेळ येते. अशा वेळी शासनाच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित होते. सरकारी रुग्णालये ही केवळ गरीब रुग्णांसाठीची व्यवस्था नसून प्रत्येक नागरिकाला परवडणाऱ्या दरात उपचार मिळण्याचा मूलभूत आधार आहेत. मात्र, शासकीय रुग्णालये उभारून त्यांना आवश्यक सुविधा न देण्याची शासनाची प्रवृत्ती चिंताजनक आहे. नांदेडच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दीड दिवसात अकरा रुग्णांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना राज्यभर गाजली होती. या घटनेने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी आणि शासनाच्या नियोजनाचा अभाव उघड केला होता. रिक्त पदे, औषधांचा तुटवडा, अपुरी यंत्रसामग्री आणि व्यवस्थापनातील त्रुटी यांचा फटका शेवटी रुग्णांनाच बसतो. अनेकदा रुग्णालयात सीटीस्कॅनसारखी अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध असते; परंतु ऑपरेटर नसल्यामुळे किंवा यंत्र नादुरुस्त असल्यामुळे ती बंद पडून राहते. परिणामी रुग्णांना खासगी केंद्रांमध्ये जाऊन अव्वाच्या सव्वा पैसे मोजावे लागतात. ही परिस्थिती केवळ यंत्रणा उभारण्याने बदलणार नाही, तर तिचे नियमित आणि सक्षम संचालन करण्याची जबाबदारी शासनाला स्वीकारावी लागेल. वाडी (बु.) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, याची काळजी सुरुवातीपासूनच घेतली पाहिजे. या रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ आणि आवश्यक वैद्यकीय कर्मचाऱ्यांची पुरेशी नियुक्ती झाली पाहिजे. आपत्कालीन सेवा, प्रसूती विभाग, शस्त्रक्रिया, रक्त तपासणी, एक्स-रे, सोनोग्राफी, सीटीस्कॅन तसेच आवश्यक औषधांचा पुरवठा अशा सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. रुग्णालयाची इमारत आधुनिक असण्यापेक्षा तेथील उपचार व्यवस्था आधुनिक आणि कार्यक्षम असणे अधिक महत्त्वाचे आहे. अन्यथा कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली इमारत ही केवळ सरकारी कामकाजातील आणखी एक देखावा ठरेल. याचबरोबर नांदेड महानगरपालिकेच्या आरोग्य व्यवस्थेकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. शहरातील नागरिकांना प्राथमिक उपचारांसाठीही मोठ्या रुग्णालयांकडे धाव घ्यावी लागू नये, यासाठी महापालिकेने सक्षम दवाखाने उभारणे आवश्यक आहे. महापालिकेने दवाखान्यांसाठी इमारती उभारल्या असल्या तरी त्या पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. इमारती बांधणे, उद्घाटने करणे आणि फलक लावणे यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष आरोग्यसेवा देण्यावर भर दिला पाहिजे. प्रत्येक प्रभागात सक्षम प्राथमिक आरोग्य केंद्रे उभारली तर मोठ्या रुग्णालयांवरील ताणही कमी होईल. वाडी (बु.) च्या उपजिल्हा रुग्णालयाच्या लोकार्पणातून नांदेडच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. आ.बालाजीराव कल्याणकर यांनी घेतलेला पुढाकार स्वागतार्ह असला तरी आता या रुग्णालयाच्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वयनासाठी लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा करणे आवश्यक आहे. उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालेले लोकार्पण हा आरंभ आहे, अंतिम टप्पा नाही. रुग्णालयाच्या दारात आलेल्या गरीब रुग्णाला उपचारासाठी दुसरीकडे धाव घ्यावी लागणार नाही, त्याला औषधे आणि तपासण्यांसाठी खासगी रुग्णालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत, अशी व्यवस्था निर्माण झाली तरच या लोकार्पणाचे सार्थक होईल. कारण आरोग्यसेवा ही शासनाची कृपा नसून नागरिकांचा अधिकार आहे. हा अधिकार प्रत्यक्षात मिळवून देणे हीच शासनाच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची खरी कसोटी आहे.

जीत कोणाची ;पैसा की गुण ?

अंकुश शिंगाडे
नागपूर

गुण हे चाकरी करतं पैशाच्या घरी. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. तसं प्रत्यक्ष पाहायलाही मिळत असतं. यावरुन पैसा हा श्रेष्ठ व गुण हे कनिष्ठ दिसून येतं. परंतु हे जरी वास्तव वाटत असलं तरी पैशापेक्षा गुणच श्रेष्ठ ठरतं. हे संकटं आल्यावर समजतं. गुणांची कधीही किंमत होत असते. गुण हे टिकून राहातं सार्वकालिक. तशी पैशाची किंमत होत नाही व पैसेवाला व्यक्ती सार्वकालिक टिकून राहात नाही.आपण नेहमी संत महात्म्ये पाहतो. त्यांचं अस्तित्व आजही आहे. ते त्या काळात जास्त श्रीमंत होते काय पैशानं? याचं उत्तर नाही असंच येतं. तरीही त्यांचं आज नाव आहे. कशाच्या भरवशावर नाव आहे? तर त्याचंही उत्तर येईल, गुणांच्या भरवशावर. यावरुन पैसा मोठा नाही. गुणच मोठे हे सिद्ध होतं.नुकतीच पदवीधरांची निवडणूक पार पडली. ज्यात अनेक दिग्गज उभे होते व मुख्य अर्थात भाजपाचे कोहळे आणि काँग्रेसचे वंजारी उभे होते.नागपूरमध्ये काँग्रेस पक्षानं बाजी मारली. सुधाकर कोहळे दोन क्रमांकावर राहिले व नितेश कराळे तीन क्रमांकावर. अन् कराळे तसे जिंकणारच नव्हते. कारण केवळ रीलच्या माध्यमातून कोणी जिंकत नाही.



कराळे...लोकँकराळेची गणती जेनजी मध्ये करतात. म्हणतात की ते वादग्रस्त व्यक्तीमत्व आहे. त्याला बरोबर बोलता येत नाही. परंतु त्यांनी घेतलेल्या मतांच्या आकडेवारीवरून समजतं की ते लोकांना किती आवडतात. तसं पाहिल्यास कराळेकडे कोणत्याही पार्टीचं पाठबळ नव्हतं. ना ही त्यांच्याकडे निवडणूकीला लावायला पुरेशा प्रमाणात पैसे होते. ना ही ते भारदस्त व्यक्तीमत्व होतं. तरीही केवळ रीलच्या भरवशावर त्यांनी एवढं मोठं मतदान मिळवलं. ही गोष्ट वाखाणण्याजोगीच आहे. तसं पाहिल्यास कराळे हे एक गुणी व्यक्तीमत्व आहे. असं त्यांचे रील पाहणारी मंडळी मानतात. त्यातच त्यांनी दिल्लीच्या आंदोलनात घेतलेला सहभाग आणि त्याच आंदोलनात सक्रियतेने सहभागी झाल्यानंतर केलेलं कार्य, ते डोक्यावर कॅरेट घेवून हिंडणारा व केळी वाटणारा कराळे, त्यातच त्यानं त्याच आंदोलनात एक व्हिडिओ बनवून केलेला राजकीय पक्षावरील आरोप. ज्यात स्वतःच्याही पक्षाला सोडलं नव्हतं. या सर्व गोष्टी कराळेंना मत मिळविण्यात फायदेशीर ठरल्या. ते कदाचित जिंकूही शकले असते. जर राजकीय पक्षाचं पाठबळ त्यांच्यासोबत असतं तर. असो. कराळे म्हणजे सामान्य व्यक्तीमत्व. सामान्यातून आलेलं व्यक्तीमत्व. कोणताही राजकीय वारसा त्यांच्या पाठीमागे नाही. ना ही पाहिजे तेवढी श्रीमंती त्यांच्या पाठीमागे आहे, की ते निवडणूक लढवू शकतील. ते तसं पाहिल्यास साधी नगरसेवकाचीही निवडणूक लढवू शकत नाहीत. अशी परिस्थिती. अशावेळेस तब्बल चोवीस हजाराच्या वर मत मिळविणं. ही साधी गोष्ट नाही. तरीही ते हरले. त्याचं कारण आहे, पैसा. कराळे कितीही गुणवान असले तरी आजच्या काळात लोकांसमोर गुण चालत नाहीत तर पैसाच चालतो. हे पुन्हा एकदा सिद्ध झालं.

पैसा व निवडणूक या एकाच नाण्याच्या बाजू. त्याबद्दल आणखी एक प्रसंग आहे. गतकाळातील एक प्रसंग सांगतो. माजी आमदार गाणार सरांच्या बाबतीत आहे. गाणार सर म्हणजे काम करणारं व्यक्तीमत्व. परंतु गतकाळात झालेल्या निवडणुकीत हिरीरीनं काम करणाऱ्या गाणार सरांना लोकांनी हरवलं व काँग्रेसचे सुधाकर अडबाले निवडून आले. म्हणजेच याठिकाणीही गुण हरले व पैशाची जीत झाली.ही दोन्ही प्रकरणं आणि दोन्ही प्रकरणात सुशिक्षीत असलेली मतदान करणारी मंडळी. एकीकडे पदवीधर असलेली व सुज्ञ विचार करणारी मंडळी. कोण आपला प्रश्न निर्भिडपणे मांडू शकतो. ही समजणारी मंडळी. तर दुसरीकडे शिक्षक असलेली मंडळी. या दोन्ही प्रकारात लोकांनी सुज्ञ शिकलेले असूनही पैसाच पाहिला असेल असं प्रकर्षानं जाणवतंच. जर सुज्ञपणे विचार केला असता तर गतकाळातील निवडणुकीत गाणार सर निवडणुकीत निवडून आले असते व आताच्या निवडणुकीत कराळे. परंतु असं घडलं नाही. तसं पाहिल्यास कोणताच व्यक्ती निवडणुकीत निवडून आल्यानंतर आपल्याला काहीच देत नाही. मात्र स्वतःचा पाहिजे तेवढा व तितका विकास करतो. हे सर्वांना माहित आहे. तरीही लोकँ पैशाकडे धावतात. व्यक्तीमत्व वा गुणांकडे धावत नाहीत. हे सिद्ध होतं.

गुण आणि पैसा. या दोन्ही घटनेत पैशाचं पारडं नेहमीच जड असतं. काल म्हणत होते की जे न करे राव, ते करे गाव. आज मात्र तसं नाही. आज नाईलाजास्तव म्हणावं लागते की जे न करे गाव, ते करे राव. राव याचा अर्थ या ठिकाणी पैसा असा आहे. पैशाबाबत अधिक सांगायचं झाल्यास आज लोकँ पैशाच्या भरवशावर शिकतात. मोठमोठ्या पदव्या मिळवतात. कोणी डॉक्टर, इंजिनिअर बनतात तर कोणी इतर काही उच्चभ्रू डिग्री घेतात. परंतु जेव्हा डिग्री घेवून बाहेर पडतात. तेव्हा कळतं की त्यांना काहीही येत नाही. फक्त पदवी आहे. यातील काही मंडळी अशी असतात की ज्थांच्याकडे पदवी आहे व पैसाही आहा. त्यांना काहीही येत नसलं तरी ते इंजिनिअर असतील तर कारखाने उघडतात, पैशाच्या भरवशावर. डॉक्टर असतील तर रुग्णालये उघडतात, पैशाच्या भरवशावर आणि त्या रुग्णालयात वा कारखान्यात सामान्य गरीब लोकांना नोकरीवर ठेवतात. त्यांच्या भरवशावर कमवतात. यातील काही लोकँ तर असेही असतात की त्यांच्याकडे जास्त शिक्षण नसतं. परंतु पैसा असतो. अशी मंडळी मोठमोठे कारखाने वा रुग्णालये पैशाच्या भरवशावर काढतात आणि त्या रुग्णालयात वा कारखान्यात पदवी घेतलेले लोकँ नोकरीवर ठेवतात. याचाच अर्थ पैसा हा मोठा आणि सरस ठरतो. याबाबतीत आणखी एक उदाहरण द्यायचं झाल्यास एका शाळेतील शिक्षकांचं देता येईल. एक शाळा व त्या ठिकाणी नियुक्त झालेला शिक्षक. तो शिक्षक गुणवान असून सध्या निवृत्तीच्या उंबरठ्यावर होता. त्यातच त्यानं जवळपास आपल्या आयुष्यातील तीस वर्ष शाळेची सेवा केली व नियुक्त वयोमानानुसार तो निवृत्त झाला. परंतु तो जेव्हा निवृत्त झाला. तेव्हा एवढी वर्ष शाळेत सेवा करुनही त्याचा कोणत्याच प्रकारचा निवृत्ती सत्कार शाळेत केल्या गेला नाही वा करण्यात आला नाही. त्याचं कारण होतं पैसा. शाळेला पैसा पाहिजे होता त्याच्या वेतनातून. त्याचे गुण हवे नव्हते. परंतु उलट घडलं होतं. शाळेचा त्यानं आपल्या गुणानं विकास केला होता. मात्र पैसा दिला नव्हता. इथंच सारं चुकलं. मग कसा होईल निवृत्ती सत्काराचा कार्यक्रम?

पैसा व गुण. कोणी म्हणतात की गुण मोठे असतात. परंतु खरं सांगायचं झाल्यास आजच्या परिस्थितीनुसार पैसाच मोठा असतो गुणांपेक्षा, असं कधीकधी वाटतं. तसं पाहिल्यास गुण हे चाकरी करतं पैशाच्या घरी. म्हणतात की उद्योगाच्या घरी ऋद्धी सिद्धी पाणी भरी. उद्योग अर्थात पैसाची मालकी असलेलं साम्राज्य व ऋद्धी सिद्धी अर्थात सामान्य जनता. आज तसंच होतं. कितीही गुण असले तरी त्याची किंमत होत नाही. मात्र पैसा असेल तर त्याची वाहवा नक्कीच होते. हे आपण नेहमी पाहतो. आज माणूसकीला किंमत नाही, पैशाला किंमत आहे, हेही आपण पाहतो. परंतु असं असलं तरी पैशापेक्षा गुण सर्वात मोठं असते. कारण जेव्हा फार मोठं संकट येतं ना. तेव्हा कितीही पैसा असला तरी तो कामात येत नाही. मात्र गुण जर असेल तर तोच कामात येत असतो. याबाबतीत आणखी एक उदाहरण देतो. एका विमानात अनेक प्रवासी बसलेले आहेत. ज्यांच्याकडे पैफा भरमसाट आहे. अशावेळेस त्या विमानाला जर आग लागली तर पैसा त्यावेळेस कामात पडत नाही. गुण कामात पडत असते. समजा त्या विमानाला अपघात झाला. अन् पैसा जर असेल तरी तो व्यक्ती मरणच पावेल. परंतु गुण असलेला व्यक्ती त्यातून कसे निघायचे. हे लक्षात घेईल. तो शितापीनं त्या विमानातून बाहेर पडेल व आपला जीव वाचवेल. याचाच अर्थ असा की कितीही पैसा असला तरी तो आपल्या काहीच कामाचा नाही. समजा पैशाच्या जोरावरापण कारखाना काढून जरी बसलो तरी तो कारखाना चालवायला हुशार तंत्रज्ञ हवेत. जे शिकले असून फायदा नाही तर त्यांना तो कारखाना चालविण्याप्रत जाणीवजागृती असायला हवी. तसंच आहे, रुग्णालयाचं. रुग्णालयातही केवळ डिग्री असून फायदा नाही तर साधं इंजेक्शन देण्याचं कसबही यायला हवं. तरंच त्याला डॉक्टर म्हणता येईल.

विशूष सांगायचं झाल्यास गुण अतिशय महत्वाची गोष्ट आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांजवळ गुण होते, म्हणूनच ते संविधान लिहू शकले. ज्या संविधानाचा आज जगात अभ्यास केला जातो व ते संविधान आज देशानं मानलेलं आहे. याठिकाणीही डॉक्टर बाबासाहेबांचा पैसा कामात आला नाही. कारण पैसा नव्हताच तेव्हा बाबासाहेबांजवळ. तसेच त्याकाळात भरपूर पैसेवाली मंडळी होती की ज्यांना संविधान लिहिण्याएवढं ज्ञान नव्हतंच. जे ज्ञान बाबासाहेबांजवळ होतं. ज्यातून संविधान निर्माण झालं. यातून हेच दिसून येतं की गुण हे पैशापेक्षा मोठं असतं. पैसा हा मोठा नाहीच. हे तेवढंच खरं.

सिमेंटची नाली असताना पुन्हा पाईप कशासाठी?,हदगावच्या पोलीस कॉलनी रस्त्याच्या कामावर प्रश्नचिन्ह

निधी,मंजुरी आणि कामाच्या नियोजनाची माहिती गुलदस्त्यात

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील पोलीस कॉलनीकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याचे नवीन काम सुरू असून, या कामाच्या नियोजनावरून आणि पारदर्शकतेवरून नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत. रस्त्यालगत यापूर्वीच सिमेंटची नाली उपलब्ध असताना पुन्हा सिमेंटचे पाईप टाकण्याचे काम सुरू असल्याने या पाईपची नेमकी आवश्यकता काय, असा सवाल जागरूक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दुसरीकडे, कामाचा माहिती फलक नसणे, मंजूर निधी आणि काम करणाऱ्या कँत्राटदाराची माहिती उपलब्ध नसणे, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नागरिकांच्या लेखी पत्राला प्रतिसाद मिळत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पोलीस कॉलनीकडे जाणाऱ्या या रस्त्याचे काम नेमके कोणत्या शासकीय योजनेअंतर्गत करण्यात येत आहे, त्यासाठी किती निधी मंजूर झाला आहे, कोणत्या लोकप्रतिनिधीच्या निधीतून हे काम सुरू आहे आणि कामाची जबाबदारी कोणत्या कंत्राटदार किंवा यंत्रणेकडे आहे, याबाबत नागरिकांना स्पष्ट माहिती मिळत नसल्याचे चित्र आहे. विकासकामांमध्ये पारदर्शकता राहावी आणि नागरिकांना कामाची माहिती मिळावी, या उद्देशाने जागरूक नागरिकांनी सप्टेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडे लेखी पत्राद्वारे विचारणा केली होती. हदगाव शहरातील विविध प्रभागांमध्ये आमदार आणि खासदार निधीतून सुरू असलेल्या विकासकामांचा योजनानिहाय प्रगती अहवाल तसेच कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावण्याबाबतही मागणी करण्यात आली होती. मात्र, या पत्राची अद्याप दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या कामातील सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे रस्त्याच्या बाजूला आधीपासूनच सिमेंटची नाली असताना पुन्हा सिमेंटचे पाईप टाकले जात असल्याचे दिसून येत आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी आधीच नालीची व्यवस्था असताना नव्याने पाईप टाकण्याची गरज का भासली? या पाईपचा नेमका उपयोग काय? त्यासाठी तांत्रिक आराखडा तयार करण्यात आला आहे का? असे अनेक प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. यासंदर्भात संबंधित सार्वजनिक बांधकाम उपविभागातील अधिकाऱ्यांकडे विचारणा



केली असता, भविष्यात एखाद्या कंपनीकडून दूरसंचारची प्रकाशतंतू वाहिनी टाकण्यात आल्यास या पाईपचा उपयोग होऊ शकतो, असे उत्तर देण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, भविष्यातील संभाव्य कामासाठी आताच सार्वजनिक निधीतून पाईप टाकण्याचा निर्णय कोणत्या तांत्रिक निकषांवर घेण्यात आला, याचे अधिकृत स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे या कामाच्या नियोजनाबाबत नागरिकांमध्ये संभ्रम कायम आहे.

शासकीय निधीतून होणाऱ्या प्रत्येक विकासकामाच्या ठिकाणी योजनेचे नाव, मंजूर निधी, काम सुरू होण्याची व पूर्ण होण्याची मुदत, कंत्राटदाराचे नाव आणि कार्यकारी यंत्रणेची माहिती असलेला फलक लावणे अपेक्षित आहे. मात्र, पोलीस कॉलनीकडे जाणाऱ्या या रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी असा माहिती फलक दिसत नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे कामाची प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजुरी, खर्च आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी याबाबत नागरिकांना माहिती मिळत नाही. विकासकामे करताना भविष्यातील गरजा, उपलब्ध पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक निधीचा काटेकोर वापर यांचा विचार होणे आवश्यक आहे. आधीच उपलब्ध असलेल्या सुविधांचा उपयोग न करता पुन्हा त्याच स्वरूपाची कामे केली जात असतील, तर त्यामागील कारण स्पष्ट होणे गरजेचे आहे. त्यामुळे या कामाच्या अंदाजपत्रकाची आणि तांत्रिक आराखड्याची तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.

सार्वजनिक निधीतून होणाऱ्या विकासकामांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व असणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पोलीस कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांवर सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपरिषद प्रशासन अधिकृत खुलासा करणार का? कामाची मंजुरी, निधी, कँत्राटदार आणि पाईप टाकण्यामागील तांत्रिक कारणे नागरिकांसमोर मांडणार का? की नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्षच केले जाणार? याकडे आता हदगाव शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

नगरसेवकांनाही कामाची माहिती नाही;नगराध्यक्षांनी लक्ष घालावे

विशेष म्हणजे, संबंधित प्रभागातील नगरसेवकांकडे या कामाबाबत विचारणा केली असता, आपल्यालाच या कामाची माहिती नसल्याचे त्यांनी सांगितल्याचे समजते. स्थानिक लोकप्रतिनिधींनाच विकासकामाची माहिती नसेल, तर कामाचे नियोजन नेमके कोणी केले? स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात का घेण्यात आले नाही? प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वयाचा अभाव आहे का? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.या संपूर्ण प्रकरणात नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांनी आणि संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. कामाला प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी आहे का, पाईप टाकण्यामागील नेमका उद्देश काय, त्यासाठी किती निधी खर्च होणार आहे आणि उपलब्ध नालीचा उपयोग का केला जात नाही, याची सविस्तर चौकशी होणे आवश्यक आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

दुष्काळामुळे खचून जावू नका;संकट काळात शासन बळीराजाच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभे-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



वाडी बु.येथील शंभर खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे लोकार्पण

नांदेड/प्रतिनिधी-दुष्काळाच्या संकटामध्ये राज्य शासन बळीराजाला वाऱ्यावर सोडणार नाही. शेतकऱ्यांना पूर्ण ताकदीने मदत करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. दिवाळीपूर्वी तातडीने पाच हजार रुपयांची मदत केली जात असून ही मदत अंतिम नाही. यानंतरही शेतकऱ्यांना मदत केली जाणार आहे. त्यामुळे धीर सोडू नका, काळजी करू नका. कोणत्याही परिस्थितीत टोकाचा विचार मनात आणू नका, आम्ही सरकार म्हणून तुमच्या सोबत आहोत, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांना दिली. तसेच या संकटकाळात शेतकऱ्यांना कर्ज वसुलीसाठी त्रास देणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

यावेळी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा आ.हेमंत पाटील, आ.अमरनाथ राजूरकर, आ. बालाजी कल्याणकर, आ.बाबुराव कदम-कोहळीकर, आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ.आनंद तिडके-बोंढारकर,आ.भिमराव केराम, आ.जितेश अंतापूरकर, महापौर कविता मुळे, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर आदींसह नागरिक उपस्थित होते. दुष्काळामुळे आज शेतकऱ्यांवर संकट ओढावले आहे, या संकट काळात संपूर्ण राज्य शासन बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. या संकटाची दाहकता ओळखून राज्य शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना विविध सवलती लागू केल्या. यापुढेही शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार आहे, शेतकऱ्यांनी धीर सोडू नये, असे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले. नांदेडची भूमी ही शेतकरी, कष्टकऱ्यांची भूमी आहे. वाडी बु. येथील शंभर खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयासह विविध विकास कामांचे लोकार्पण झाले आहे. आजपासूनच हे उपजिल्हा रुग्णालय नागरिकांच्या सेवेत कार्यरत होत आहे. तसेच या सुसज्ज इमारतीतीत सिटी स्कॅन आणि डायलिसिस सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना आरोग्य मंत्र्यांना दिल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि गोरगरीब नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा स्वस्त दरात उपलब्ध होतील. यासोबतच आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने नांदेड जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी ५०० खाटांची सुसज्ज इमारत उभारली जाणार असून त्याचे भूमिपूजनही लवकरच केले जाईल, असे सांगून लोकांना चांगल्या आरोग्य सेवा देण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नमूद केले. तसेच नांदेडच्या विकासाला निधी कमी पडू देणार नाही. जनतेला चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, वाडी बु. येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या सिटी स्कॅन, डायलिसिस सुविधा आणि वाढीव खाटांची मागणी तातडीने मंजूर करण्यात येईल. तसेच याठिकाणी मेंदूविकार, हृदयरोग यासारख्या विशेष तज्ज्ञ वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच टाटा मेमोरियल ट्रस्टच्या सहाय्याने महा केअरच्या माध्यमातून नांदेड येथे कर्करोगावरील उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

दुष्काळी अनुदानासाठी फार्मर आयडी सक्तीची;ज्येष्ठ महिला-पुरुषांना करावा लागतो अडचणींचा सामना

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यात दुष्काळी अनुदान मिळवण्यासाठी शासनाकडून फार्मर आयडीची सक्ती करण्यात आल्याने मयत शेतकऱ्यांच्या वारसदारांना प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातच साठ वर्षावरील महिला व पुरुषांच्या बोटाची ठसे उमटत नसल्याने निराधार प्रमाणे करण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही. परिणामी, अनेक पात्र शेतकरी व वारसदारांचे दुष्काळी अनुदान दुष्काळी असून, शासकीय मदतीच्या प्रतीक्षेत त्यांची फरपट सुरू आहे.

देगलूर तालुक्यात दुष्काळामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. यांपैकी केवळ ६० ते ७० टक्के शेतकऱ्याकडे फार्मर आयडी उपलब्ध असून, उर्वरित शेतकऱ्यांचे फार्मर आयडी अद्याप तयार झालेली नाही. मागील दोन-तीन वर्षात तालुक्यात अनेक शेतकऱ्यांचे निधन झाले आहे. त्यांच्या मुलगा, पत्नी किंवा अन्य वारसदाराकडून आजही शेती केली जात असली तरी, सातबारा उताऱ्यावरून मयत शेतकऱ्यांचेच नाव असल्याने फार्मर आयडी आणि ई-केवायसी प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. दुसरीकडे साठ वर्षावरील महिला व पुरुषांच्या बोटांचे ठसे वयोमानानुसार उमटत नसल्याने ऑनलाइन निराधार प्रामाणिकरणाची प्रक्रिया पूर्ण होत नाही. त्यामुळे प्रत्यक्षात पात्र असूनही अनेक ज्येष्ठ नागरिकांना अनुदान मिळवण्यासाठी अडचणीचा सामना करावा लागत आहे. एका बाजूला मयत शेतकऱ्यांच्या वारसांचा फार्मर आयडी प्रश्न, तर दुसऱ्या बाजूला ज्येष्ठ नागरिकांच्या बायोमेट्रिक प्रामाणिकरणाचा प्रश्न, अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. सध्या तहसील कार्यालयात दुष्काळी अनुदानाच्या पात्र लाभार्थ्यांच्या याद्या अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सण उत्सवाच्या काळात तरी अनुदानाची रक्कम खात्यात जमा होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. मात्र, तांत्रिक व प्रशासकीय अडचणीमुळे अनुदान लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तालुकास्तरावर सेतू सुविधा केंद्र उपलब्ध आहेत मात्र महेश शेतकऱ्यांच्या वारसांना वारस प्रमाणपत्र व इतर आवश्यक्य कागदपत्रांच्या आधारे अनुदानाचा लाभ द्यावा, तसेच बोटाचे ठसे उमटत नसलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी पर्यायी प्रामाणिककरणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, यासाठी तालुक्याच्या ठिकाणी विशेष केंद्र चालू आहेत मात्र त्या ठिकाणी फार्मर आयडी, ई-केवायसी व निराधार प्रमाणे करण्याची कामे एकाच ठिकाणी करून द्यावीत, अशी मागणी शेतकरी व नागरिकांत होत आहे.



पिंपळगाव निमजी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती काढणाऱ्या ठिकाणी विशेष पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालयाच्या पथकाने धाड टाकुन इंजिन बोट, हायवा व तराफे असा ८६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे हिमायतनगर तालुक्यात आरोग्य सुविधांच्या सक्षमीकरणासाठी निर्देश

नांदेड/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला सुलभ, तत्पर आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यास शासनाचे प्राधान्य असून, आरोग्य यंत्रणेने गावातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून सेवा द्याव्यात, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज हिमायतनगर तालुक्यातील पाहणी दौऱ्यादरम्यान दिले.

आरोग्य संवाद यात्रा २०२६ अंतर्गत आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी हिमायतनगर तालुक्यातील दरेगाव तांडा, वाळकेवाडी, दुधड, सरसम आणि हिमायतनगर येथील विविध आरोग्य संस्थांना भेटी देऊन आरोग्य सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी ग्रामस्थ, रुग्ण, आरोग्य कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या. हिमायतनगर तालुक्यातील दरेगाव तांडा येथे आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी दरेगाव तांडा येथील शेती पिकांची पाहणी करुन शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनतर त्यांनी गावात जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधून दुष्काळी परिस्थिती, स्थानिक अडचणी आणि आरोग्यविषयक समस्यांची माहिती घेतली. गावातील प्रत्येक घरापर्यंत आरोग्य सेविका व आरोग्य सेवकांनी पोहोचून आवश्यक आरोग्य तपासणी, औषधोपचार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन द्यावे. कोणताही नागरिक शासकीय आरोग्य सेवा व योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. वाळकेवाडी येथील दुष्काळग्रस्त भागाच्या पाहणीदरम्यान आरोग्यमंत्री आबिटकर यांनी दिवंगत राजू ढाले यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

पोक्सो कायद्याविषयी जनजागृती ही काळाची गरज-न्या.पी.एम.माने

किनवट/प्रतिनिधी-बालपण हा आयुष्यातील सर्वांत सुंदर काळ आहे. या काळात प्रत्येक बालकाला सुरक्षितता, प्रेम, सन्मान आणि विश्वास मिळणे आवश्यक आहे. मात्र, बालकांवरील अत्याचार, लैंगिक शोषण आणि बालहक्कांचे उल्लंघन या गंभीर समस्यांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे तसेच बालकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश पी. एम. माने यांनी केले.

येथील सरस्वती विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत तालुका विधी सेवा समितीच्या वतीने आयोजित सुरक्षित बचपन अभियान आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (पोक्सो) कायदा, २०१२ या विषयावरील अखिल भारतीय शालेय जनजागृती मोहिमेच्या समारोपीय कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.यावेळी सहदिवाणी न्यायाधीश के.जी.मेंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. ॲड. एस. पी. दारवंडे, ड.आर. डी.सोनकांबळे तसेच अधिकार मित्र (पी.एल.व्ही.) व उपप्राचार्य डॉ.पंजाब शेरे यांनी आपल्या मार्गदर्शनातून बालसुरक्षेचे महत्त्व, पोक्सो कायद्यातील तरतुदी आणि बालकांच्या हक्कांविषयी कायदेविषयक व शैक्षणिक दृष्टिकोनातून माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्तविक ॲड. विलास सूर्यवंशी यांनी व सूत्रसंचालन अधिकार मित्र उत्तम कानिंदे यांनी केले तर शिक्षिका राधिका तिरमनवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आदिवरद नेम्माणीवार, कला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. मार्तंड कुलकर्णी, ॲड.दिलीप काळे, ॲड.संकेत राठोड, ॲड.एस.एम.सर्पे, न्यायालयाचे वरिष्ठ लिपिक एम.के.शेख, पैरवी अधिकारी पी.एन.गुरनुले, पोलीस कॉन्स्टेबल वागतकर तसेच न्यायालयीन कर्मचारी भारत राठोड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रो.डॉ.सुनील व्यवहारे, पर्यवेक्षक प्रा.रेणुकादास पहुरकर, प्रा.सुहास कुलकर्णी, प्रा.शेषीकांत ठोंबरे, चंदन यंड्रलवार, संध्या सिरमनवार, गणपत चाभरकर, ईश्वर बावणे, करण मुंडे, ऋषभ पडधरिया, ओमेश्वर राठोड, निखिल सिरमनवार, रेश्मा फयाजोद्दीन, तृप्ती बावणे, रचना तक्कलवार, सेवक लक्ष्मण कासाडीवर तसेच सेवानिवृत्तीच्या दिवशीही सेवाभाव जपत सहकार्य करणारे मधुकर ताडपेल्लीवार यांनी परिश्रम घेतले.

दारूचे चार बॉक्स लंपास

नांदेड/प्रतिनिधी-उमरी बायपास रोडवर एका वाहनातून दारुचे चार बॉक्स चोरट्यांनी चोरुन नेले आहेत.

आयचर वाहनातून विदेशी दारुचे बॉक्स वाहतूक करीत असतांना मुदखेड बायपास रोडवर अज्ञात चोरट्यांनी वाहनावर चढून दारुचे चार बॉक्स चोरुन नेले आहेत.

देगलूर येथील जुगार अड्डयावर पोलीसांची धाड;सात जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर शहरातील गंगासागर बारच्या बाजुला सुरु असलेल्या जुगार अड्डयावर पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांनी धाड टाकुन सात जणांना अटक केली आहे.

गंगासागर बीअरबारच्या बाजूला जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांना मिळाली. शनिवारी रात्री त्यांनी सदरील जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना माधव गंगाराम कोकणे (वय ३६) रा.करडखेड, विरभद्र शंकरराव मोघे (वय २८) रा.सांगवी, महेंद्र दत्तात्रय कुलकर्णी (वय ३६) रा.करडखेड, रामा हणमंत दरगलवाड (वय ४०) रा.करडखेड, बसवंत मारोती मुंगडे (वय ३१) रा.करडखेड, ईश्वर आनंदराव पाटील (वय ३५) रा.केदारकुंटा, विठ्ठल इरन्ना गडपवार (वय ५१) रा.दरेगाव यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम, जुगाराचे साहित्य, मोबाईल असा १ लाख १३ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या प्रकरणी सात जणांविरुध्द देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महिलेच्या पर्समधून तीस हजार रुपये लंपास

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील वजिराबाद भागात एका महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्यांनी ३० हजार रुपये लंपास केल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली आहे. शोभा भारत मेलवार (वय ६१) रा.गोवर्धनघाट, नांदेड ह्या रविवारी सायंकाळी वजिराबाद मार्केटमधून खरेदी करीत असतांना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पर्समधील ३० हजार रुपये चोरुन नेली आहे. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जाहीर प्रगटन

३ रे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर नांदेड यांच्या न्यायालयातील
किरकोळ अर्ज क्र.१७०३/२०२६
गुलाम मोहम्मद हाजी अब्दुल रज्जाक व निल
अर्जदार : १. गुलाम मोहम्मद पि.हाजी अब्दुल रज्जाक वय ६१ वर्षे, धंदा व्यापार, २. मुस्तकिम नवीवाला पि.गुलाम मोहम्मद नवीवाला वय ३७ वर्ष धंदा व्यापार, ३. मोहम्मद अबरार नवीवाला पि.गुलाम मोहम्मद नवीवाला वय २९ वर्ष, धंदा : व्यापार, ४. अब्दुल रज्जाक नवीवाला पि.गुलाम मोहम्मद नवीवाला वय ३९ वर्ष, धंदा : व्यापार, सर्व रा.साईनगर, इतवारा,नांदेड, ५. महके बानू भ्र.मोहम्मद आवेस गाझी पि.गुलाम मोहम्मद नवीवाला वय ३४ वर्षे, धंदा : घरकाम, रा.शालीमार शु सेंटर, मोहम्मद अली रोड, अकोला
विरुद्ध
निल
दावा :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे. ज्याअर्थी अर्जदार मयत महेफुजा भ्र.गुलाम मोहम्मद यांचे वारस आहेत मयत महेफुजा भ्र.गुलाम मोहम्मद यांचा मृत्यू दिनांक १५/०९/२०२६ रोजी झाला. अर्जदार क्र.१ हे मयताचे पती, अर्जदार क्र.२ ते ४ हे मयताचे मुले आणि अर्जदार क्र.५ ही मयताची मुलगी आहे. हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा शिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक ०७/१२/२०२६ रोजी किंवा जाहीर प्रगटन दिल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क.लिपीक
३ रे सह दि.न्या.क.स्तर,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
स.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर,नांदेड

जाहीर प्रगटन

३ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१२५४/२०२६
प्रसाद पि.राजेश्वरराव गुंडु विरुद्ध वैद्यकीय अधिकारी तथा निबंधक,
नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेड
नोटीस

अर्जदार : प्रसाद पि.राजेश्वरराव गुंडु वय ४२ वर्ष, व्यवसाय व्यापार, रा.लेबर कॉलनी हनुमान मंदिराजवळ नांदेड, ता.जि.नांदेड

गैरअर्जदार : वैद्यकीय अधिकारी तथा निबंधक, नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार प्रसाद पि.राजेश्वरराव गुंडु वय ४२ वर्ष, व्यवसाय व्यापार, रा.लेबर कॉलनी हनुमान मंदिराजवळ नांदेड, ता.जि.नांदेड अर्जदार यांचे आजोबा कोमरय्या पोचय्या गुंडु मृत्यू दिनांक २४-०४-२०१० रोजी राहत्या घरी येथे झाला असता अर्जदाराने मृत्यू प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन मृत्यू प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नावे मृत्यू प्रमापत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक २६-११-२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना मृत्यू प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक १५-१०-२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

महाराष्ट्र शासन

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,छत्रपती संभाजीनगर
कार्यकारी अभियंता,ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.६,नांदेड
ई-मेल-eeuppd6.nandedwrd@maharashtra.gov.in, दूरध्वनी क्रमांक-०२४६२/२६१४४७

ई-निविदा सूचना क्र.०२ सन-२०२६-०७

कार्यकारी अभियंता,ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.६, नांदेड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https//mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. या निविदा सुचनेमध्ये निविदा किंमत १४५४.११ लक्ष पर्यंतची कामे अंतर्भूत आहेत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.६,नांदेड, यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. निविदेची संपूर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कामाचे नाव :- १) उर्ध्व पैनगंगा प्रकल्प अंतर्गत निमटेक वितरिका कि.मी.११ ते २३ वरील वितरण व्यवस्थेवरील मधील उर्वरित मातीकाम बांधकामे व अस्तरीकरनाचे काम
जिल्हा :- नांदेड
ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.०२/११/२०२६ ते दि.१६/११/२०२६
ई-निविदा उघडणे : दि.१७/११/२०२६ (शक्य झाल्यास)
खालील ठिकाणी ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. संकेतस्थळ https//mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेत स्थळावर कळविण्यात येईल.)
२. कार्यकारी अभियंता, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.६, नांदेड कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.उपेप्रविक्र.६/लेखा-२/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.६,नांदेड

दिनांक :-
स्वाक्षरित/-
कार्यकारी अभियंता
ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.६,नांदेड

डीजीआयपीआर/आरओसी-२०२६-२७/क्र.-५/सी ३५११

इंजेगाव येथे स्नान करणाऱ्या मामीचा भाच्याने केला व्हिडीओ तयार

किनवट पोलिस ठाण्यात दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल

किनवट/प्रतिनिधी-किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इंजेगाव येथील दिगंबर जळबा अकोले यांनी कृष्णा रावसाहेब अथरणे (वय वर्ष २०) याला वीस हजार रुपयांचे आमिष दाखवून एका महिलेचा स्नान करीत असतानाचा व्हिडिओ तयार करून व्हॉयरल करण्यासाठी प्रवृत्त केल्याची कृष्णाने पिडीत मामी आणि तिच्या पतीसमोर कबुली दिल्यानंतर पिडीतेने ३१ ऑक्टोबर रोजी पोलीस ठाण्यात धाव घेतलीय. पिडीत मामीच्या फिर्यादीवरून भाचा कृष्णा आणि प्रकरणाचा कट रचणारा दिगंबर अकोले विरुद्ध पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केलीय. अद्यापपर्यंत या मस्तवालांना चतुर्भुज केल्याचे वृत्त नाही.

पोलीस निरीक्षकांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वेळीच चतुर्भुज न केल्यास प्रकरण चिघळण्याची शक्यता व्यक्तविली जात आहे. मामी आणि भाचा या पवित्र नात्याला काळिमा फासणारा प्रकार इंजेगाव येथे घडविण्यात आला आहे. मामी स्नान करीत असतांना भाच्याने खाजगी व्हिडिओ मोबाईलमध्ये चोरून रेकॉर्ड करून तो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार पिडीतेच्या फिर्यादीवरून उघडकीस आला आहे. इंजेगावातील व्हिडिओ प्रकरणाच्या कुजबुजीनंतर पीडित महिलेने आणि तिच्या पतीने याविषयी खातरजमा करण्यासाठी गावात चौकशी केली असता, गावातीलच प्रकाश भदात्रे यांच्याकडे तो व्हिडिओ असल्याचे समजले. भदात्रे यांच्या मोबाईलवरून पीडितेच्या पतीच्या मोबाईलवर तो व्हिडिओ शेअर करण्यात आला. तो व्हिडिओ पाहिल्या-नंतर तो खाजगी व्हिडिओ याच पिडीतेचा असल्याची खात्री पटली.दिगंबर अकोले यांनी कृष्णाला पैशाचे आमिष दाखवून हे बदनसीब कृत्य घडवीले. व्हिडिओ क्लिप रेकॉर्ड केला अशी विचारणा केली असता, गावातील मुलांनी तो व्हिडिओ पीडितेचा भाचा कृष्णा रावसाहेब अधरणे (वय २०, रा. इंजेगाव) याच्याकडून मिळाल्याचे सांगितले. पीडित महिलेने भाचा कृष्णाकडे चौकशी केली असता, त्याने दिगंबर जलबाजी अकोले याच्या सांगण्यावरून हा व्हिडिओ तयार केल्याची कबुली दिली. तसेच, हा व्हिडिओ व्हायरल केल्यास वीस हजार रुपये देईन, अशी लालच दिगंबर अकोले याने दिल्याचेही समोर आले. आपली बदनामी करून समाजात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणाऱ्या कृष्णा अधरणे आणि दिगंबर अकोले या दोघांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पीडितेने पोलीसांना दिलेल्या जबाबादरम्यान केली आहे.

मुखेडमध्ये जलजीवन मिशनच्या खोदकामामुळे रस्त्यांची दुर्दशा

तातडीने दुरुस्तीसाठी शेकापच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड शहरातील प्रभाग क्र.९ व इतर प्रभागांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाईपलाईनच्या कामामुळे रस्त्यांची मोठी दुरवस्था झाली आहे. या नादुरुस्त रस्त्यांमुळे नागरिकांना होत असलेल्या नाहक त्रासाची दखल घेत, शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने मुखेड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

सध्या जलजीवन मिशन अंतर्गत पाईपलाईन टाकण्यासाठी ठेकेदाराने रोड ब्रेकरच्या साहाय्याने रस्ते फोडून ठेवले आहेत. रस्ते खोदून ते तसेच सोडून दिल्याने नागरिकांना ये-जा करणे कठीण झाले आहे. अनेक वेळा शालेय विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक या रस्त्यावरून जाताना दगडांवरून घसरून आणि खड्ड्यांत पडून जखमी झाल्याच्या दुर्दैवी घटना घडल्या आहेत. प्रशासनाच्या आणि ठेकेदाराच्या या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.या गंभीर समस्येवर त्वरित तोडगा काढावा आणि रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, या मागणीसाठी शेकापच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात जाऊन त्यांना प्रत्यक्ष निवेदन सुपूर्द केले. येत्या काही दिवसांत रस्ते दुरुस्त करून रहदारीसाठी सुरक्षित न केल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे. मुख्याधिकाऱ्यांना हे निवेदन देताना शेकापचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई आसद बल्खी, मुजीब कुरेशी, सदाशिव भाऊजी, सय्यद फेरोज, खदिर शेख आणि फयुम बल्खी हे उपस्थित होते.

डॉ.गंगाधर तोगरे यांना शिवा संघटनेचा उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जाहीर

कंधार/प्रतिनिधी-येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ.गंगाधर तोगरे यांना शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जाहीर झाला आहे. अशी माहिती शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी दिली आहे. या पुरस्काराचे वितरण २४ नोव्हेंबर रोजी श्री क्षेत्र कपिलधार येथे शिवा संघटनेच्या ३१ व्या राज्यव्यापी वार्षिक महामेळाव्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.



मन्याडखोऱ्यात डॉ.गंगाधर तोगरे हे गत अडीच दशकापासून अभ्यासू, व्यासंगी असे पत्रकार म्हणून प्रसिद्ध व्यक्तीमत्व आहेत. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आरोग्य, कृषी, ऐतिहासिक आदींवर केलेले वार्तांकन लक्षवेधी ठरतात. शेतकरी, शेतमजूर, सामान्य, भटके विमुक्त, वंचित, उपेक्षित समाजाचे प्रश्न ऐरणीवर आणून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या लेखनीचा सदुपयोग मोठया खुबीने करतात. मराठवाडी मातीला संघर्षाचा गंध: एकट्या कल्हाळीने दिले हुतात्मे. हे हैद्राबाद मुक्ती संग्राम लढ्यातील कल्हाळी ता. कंधार येथील रोमांचकारी प्रसंग नवीन पिढीला अवगत करून देण्याचा प्रयत्न डॉ.गंगाधर तोगरे यांनी केला. प्रतिष्ठेचा हा पुरस्कार दि.२४ नोव्हेंबर २०२६ रोजी कपिलधार ता.व जिल्हा बीड येथे शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार, ना. पंकजाताई मुंडे, ना.अतुल सावे, माजी मंत्री धनंजय मुंडे, माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आदींच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.असे प्रा.मनोहर धोंडे, शिवा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभयराव कल्लावार, सरचिटणीस उमाकांत अप्पा शेटे यांनी जाहीर केले. डॉ.गंगाधर तोगरे यांची उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी निवड केल्याने त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

जि.प.अन् पं.स.निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्याने इच्छुकांच्या आशा पल्लवीत

देगलूर/प्रतिनिधी-ग्रामीण राजकारणाचा केंद्रबिंदू मानला जाणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची प्रतीक्षा आता संपण्याची चिन्हे दिसू लागले आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावरून गेल्या अनेक दिवसापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना न्यायालयीन घडामोडीमुळे नव्याने गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या परीक्षेत असलेल्या इच्छुकांच्या अशा पुन्हा एकदा पल्लवीत झाल्या असून ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापू लागले आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लांबल्यामुळे अनेक इच्छुकांचा सह काहीसा कमी झाला होता. निवडणुका नेमक्या कधी होणार? आरक्षणाचे चित्र कधी स्पष्ट होणार आणि राजकीय समीकरणे कोणत्या दिशेने जाणार? याबाबत अनिश्चितता कायम होती. आता न्यायालयाच्या निर्णयानंतर निवडणुकीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने राजकीय कार्यकर्त्यांमध्ये नवचेतन्य निर्माण झाले आहे. देगलूर तालुक्यात हाणेगाव, मरखेल, करडखेड, शहापूर, खानापूर, मानूर परिसरातील ग्रामीण राजकारणातही हालचाली वाढू लागल्या आहेत. जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणामध्ये कोणाला संधी मिळणार? कोणत्या गावातून कोणता चेहरा पुढे येणार? याबाबत गावोगावी चर्चा रंगू लागल्या आहेत. इच्छुक उमेदवारांकडून गावभेटी, कार्यकर्त्यांशी संपर्क, सामाजिक कार्यक्रमांमध्ये उपस्थिती आणि स्थानिक प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहे. काही ठिकाणी जुन्या राजकीय वैराला पुन्हा उजाळा मिळाला असेल, तर काही ठिकाणी नव्या राजकीय आघाड्या आणि गटबाजीची समीकरणे जुळण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गावातील प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी आणि प्रभावशाली व्यक्तीच्या भेटीगाठींना महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे निवडणुकीची अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच ग्रामीण राजकारणात वातावरण निर्मिती सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे.

आगाऊ हजेरीच्या सह्यांमुळे बांधकाम विभागात खळबळ

आ.किसनराव वानखेडेंची अचानक पाहणी;अभियंत्यांना धरले धारेवर

उमरखेड/प्रतिनिधी-शासकीय कार्यालयांमधील बेशिस्तपणा आणि विकासकामांतील अनागोंदीला आळा घालण्यासाठी उमरखेडचे आ.किसनराव वानखेडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग क्रमांक २, उमरखेड या कार्यालयाला त्यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. यावेळी काही कर्मचाऱ्यांनी हजेरी पटावर चक्क पुढील दिवसांच्या तारखांवर आगाऊ स्वाक्षऱ्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित कर्मचाऱ्यांकडून तातडीने लेखी खुलासा घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

शासकीय कार्यालयातील शिस्तीचा भंग सहन केला जाणार नाही. भविष्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेत प्रतिकूल नोंद करण्यात येईल, असा कडक इशाराही आ.वानखेडे यांनी दिला.यावेळी त्यांनी तालुक्यात सुरू असलेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्यांच्या कामांचा आढावा घेतला. कामांचे अंदाजपत्रक, काँक्रीटचे प्रमाण, मिश्रणाचे गुणोत्तर याबाबत त्यांनी अभियंत्यांना तांत्रिक प्रश्न विचारले. कामाचा दर्जा तपासण्यासाठी मोजमाप पुस्तिका आणि अंदाज पत्रकाच्या प्रती मागविल्या; मात्र संबंधित अधिकारी त्या तत्काळ सादर करू शकले नाहीत. त्यामुळे आमदारांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.केवळ कार्यालयात बसून अहवाल तयार करण्यापेक्षा अभियंत्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन बांधकामाच्या गुणवत्तेची तपासणी करावी, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध ठेवावीत, काँक्रीटचे पाणी मारण्याचे काम (क्युरिंग) कधी सुरू झाले आणि किती दिवस चालणार, याची माहिती दर्शनी फलकावर लावावी, तसेच प्रत्येक कामाच्या अंदाज पत्रकाची प्रत कार्यालयात ठेवावी, असे निर्देशही त्यांनी दिले. शासकीय कार्यालयांमध्ये वेळेचे पालन, कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि विकासकामांचा दर्जा याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा आ.किसनराव वानखेडे यांनी यावेळी दिला. त्यांच्या या अचानक पाहणीमुळे बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



पोलीस मुख्यालयात आयोजीत गोळीबार प्रशिक्षिणात कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी अचुक नेमबाजी करुन प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल त्यांचा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी प्रशस्ती प्रमाणपत्र देवून अभिनंदन केले आहे.

पान १ वरुन

राज्य मंत्रिमंडळात...

केल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या बैठकीत संबंधित विषयावर विचारविनिमय झाल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे पक्षांतर्गत पातळीवर संबंधित माजी मंत्र्याच्या पुनरागमनासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे.

जाहीर प्रगटन

५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१४६५/२०२६
रमेश वि.ग्रामपंचायत
नोटीस

अर्जदार : रमेश पि.होणाजी रासे वय : २७ वर्ष,रा.नेरली ता.जि.नांदेड
गैरअर्जदार : ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय नेरली ता.जि.नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार रमेश पि.होणाजी रासे वय २७ वर्ष, रा.नेरली ता.जि.नांदेड यांचा जन्म दिनांक १५-१०-१९९९ रोजी राहत्या घरी झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नामे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक २२/१२/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक ३१-१०-२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

पतंजलीच्या गायीच्या तुपाचा २० लाखांचा साठा जप्त!

छत्रपती संभाजीनगरमध्ये अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी- छत्रपती संभाजीनगर शहरातील एका मोठ्या गोदामावर छापा टाकून अन्न व औषध प्रशासन विभागाने धडक कारवाई करीत पतंजली कॅंमनीच्या गायीच्या तुपाचा तब्बल २० लाख २० हजार १९० रुपये किमतीचा साठा जप्त केला आहे. भेसळीच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली असून, एकूण ४ हजार ३२ युनिट्समधील २ हजार २७९.७ लिटर तूप प्रशासनाने ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे खाद्यपदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

सणासुदीच्या काळात बाजारपेठेत विक्रीसाठी येणाऱ्या खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) धडक मोहीम हाती घेतली. शहरातील सुंदरवाडी परिसरात केंब्रिज स्कूलजवळ असलेल्या 'मेसर्स दिव्य महावितरक' या विजय कडुबा जाधव यांच्या गोदामावर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने अचानक छापा टाकला. या गोदामात विक्रीसाठी साठवून ठेवलेल्या पतंजली कॅंमनीच्या गायीच्या तुपाच्या गुणवत्तेबाबत संशय निर्माण झाल्याने अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी तपासणी केली. त्यानंतर अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींनुसार संबंधित तुपाचा साठा जप्त करण्यात आला.या कारवाईत पहिल्या टप्प्यात २ हजार ९९८ युनिट्समधील १ हजार ३४९.१ लिटर तूप जप्त करण्यात आले. या साठ्याची किंमत १२ लाख २९ हजार १८० रुपये आहे. तर दुसऱ्या टप्प्यात १ हजार ३४ युनिट्समधील ९३०.६ लिटर तूप ताब्यात घेण्यात आले. त्याची किंमत ७ लाख ९१ हजार १० रुपये आहे. अशा प्रकारे एकूण ४ हजार ३२ युनिट्समधील २ हजार २७९.७ लिटर तुपाचा २० लाख २० हजार १९० रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

पान १ वरुन

नांदेड न्यायालय तातडीने...

अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे धमकीची सत्यता तपासण्याचे काम सुरू आहे. मात्र, एकाच वेळी राज्यातील अनेक जिल्हा न्यायालयांना लक्ष्य करण्यात आल्याने न्यायालयीन सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिस प्रशासनाकडून नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. राज्यातील न्यायालयाच्या इमारतीसह संपूर्ण परिसराची कसून तपासणी सुरू करण्यात आली. धमकीचा ई-मेल कोठून पाठविण्यात आला, याचा शोध सायबर पोलिस घेत आहेत.

आढावा बैठकीत लोकप्रतिनिधींनी...

द्यावी व नर्सिंग स्कुललाही मंजुरी देण्याची मागणी खा.अशोक चव्हाण यांनी व्यक्त केली. भोकर येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे काम पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत असेही खा.अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे. सदरील आढावा बैठकीत आरोग्य विभागातील गलथान कारभारावर लोकप्रतिनिधींनी आक्रमक भूमीका घेतली होती. आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीवर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य विभागात आनंदीआनंद आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त करुन अधिकाऱ्यांना कामकाज सुधारण्याच्या सुचना दिल्या. आरोग्य संवाद यात्रेच्या माध्यमातून विभागात लवकरच बदल दिसून येतील असे त्यांनी सांगितले. या बैठकीला खा.अशोक चव्हाण, खा.डॉ.अजित गोपछडे, आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ.राजेश पवार, आ.डॉ. तुषार राठोड, आ.श्रीजया चव्हाण हे दुरदर्शीप्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच आ.हेमंत पाटील, आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंदराव बोंढारकर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जि.प.सीईओ महेश पाटील यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

माझ्याविरोधात महिलांची टोळी...

असल्याचा दावा केला. माझ्याविरोधात महिलांची टोळी तयार केली जात आहे. काही महिला मुख्यमंत्र्यांना भेटल्या होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला पुरावे विचारले तर मी ते देण्यास तयार आहे, असे जरांगे म्हणाले. यापूर्वी कथित ऑडिओ क्लिप सार्वजनिक करून सत्ताधाऱ्यांना अडचणीत आणल्यानंतर आता त्यांनी केलेल्या या नव्या आरोपामुळे राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे.यावेळी जरांगे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही नाव न घेता टीका केली.

खानापूर येथील जि.प.शाळेत...

मार्गदर्शनाखाली अनुभवी व अध्यापनाची आवड असलेल्या शिक्षकांची तात्पुरती पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होताच नोव्हेंबर नंतर शिक्षक समायोजन होऊन पूर्ण वेळ शिक्षक उपलब्ध होण्याची शक्यता आहे, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी यांनी दिली.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४